
| वर्ष - 9 ।अंक -40 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™



www.mahaenews.com ।बुधवार, दि. 1 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- भारताच्या लेकींची विजयी सलामी!
- सांस्कृतिक परंपरेचा खजिना म्हणजे दसरा..!
- गाझासाठी ट्रम्प यांचा शांततेचा प्रस्ताव!
- शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत द्या!

## ठाकरे-शिंदेंची तोफ कधी धडाडणार?

नागपूर, मुंबई, बीडसह संपूर्ण राज्याचे सभांकडे लक्ष

# दसऱ्याला राज्यात पाच मेळावे!

## महाराष्ट्रात दसरा म्हणजे केवळ सण नव्हे तर राजकारणातील मोठा टप्पा

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

महाराष्ट्रासाठी दरवर्षी दसरा मेळावा फार महत्त्वाचा आहे. कारण याच दसरा मेळाव्याच्या दिवशी राज्यातील राजकारणाला कलाटणी देणारी योजना, विधानं केली जातात. दरवर्षी नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा मेळावा असतो. मुंबईत शिवसेनेच्या दोन्ही गटांचाही दसरा मेळावा भरतो. भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यादेखील भगवानगडावर आपला वेगळा दसरा मेळावा घेतात. तर मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे हेदेखील नारायण गडावर आपला दसरा मेळावा आयोजित करत आहेत. त्यामुळेच आता दसऱ्याच्या दिवशी म्हणजेच 2 ऑक्टोबर रोजी कोणत्या नेत्याचा दसरा मेळावा कुठे होणार? सोबतच यावेळच्या दसरा मेळाव्याची नेमकी काय तयारी चालू आहे, ते पाहुया...



### उद्धव ठाकरेंच्या मेळाव्याची जय्यत तयारी

शिवसेनेची शकलं होण्याआधी दरवर्षी मुंबईतील शिवाजी मैदानावर या पक्षाचा मोठा दसरा मेळावा आयोजित केला जायचा. मात्र आता या पक्षाचे दोन गट पडल्यावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा दसरा मेळावा दादरमधील शिवाजी मैदानावर आयोजित केला जातो. यावेळीदेखील हा दसरा मेळावा शिवाजी मैदानावरच होणार आहे. यंदाचा दसरा मेळावा अनेक अर्थांनी वेगळा ठरण्याची शक्यता आहे.

### शिंदेंच्या मेळाव्याचे ठिकाण बदलले

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील आपला दसरा मेळावा आयोजित करतात. आपल्या दसरा मेळाव्यात ते शिवसैनिकांना संबोधित करतात. या वर्षी त्यांचा दसरा मेळावा मुंबईतील आझाद मैदानावर होणार होता. आता मात्र त्यांच्या मेळाव्याचे ठिकाण बदलण्यात आले असून तो यंदा आझाद मैदानाऐवजी नेस्को सेंटरमध्ये होणार आहे. केवळ एमएमआर क्षेत्रातील शिवसैनिकांसाठी नेस्को येथे दसरा मेळावा होणार आहे.

### मनोज जरांगे यांचा दसरा मेळावा 900 एकरवर

मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांचाही बीड जिल्ह्यात दसरा मेळावा होणार आहे. बीडच्या नारायणगडावर या दसरा मेळाव्याची तयारी सुरू झालेली आहे. दरवर्षी नारायणगडावर पारंपरिक पद्धतीने दसरा मेळावा संपन्न होत असतो. गेल्यावर्षी देखील लाखोंच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांचा दसरा मेळावा संपन्न झाला होता. या दसरा मेळाव्याची 350 एकरवर तयारी सुरू असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

### भगवान गडावरदेखील जय्यत तयारी

भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यादेखील दरवर्षी दसरा मेळावा घेतात. त्यांचा हा मेळावा बीड जिल्ह्यातील भगवान गडावर होत असतो. यावेळीही पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. या मेळाव्यासाठी भव्य मंच उभारण्यात येणार असून मंडपही टाकला जाणार आहे. या मेळाव्यासाठी हेलिपॅड देखील तयार करण्यात आले असून हेलिकॉप्टरने मंत्री पंकजा मुंडे 11 वाजता मेळाव्याच्या ठिकाणी दाखल होतील.

### संघाच्या शस्त्रपूजनाकडेही विशेष लक्ष

यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे दसऱ्याच्या दिवशी संघातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व असणार आहे. दसऱ्याच्या दिवशी संघाकडून शस्त्रपूजन केले जाते. यंदाच्या विजयादशमीपासून संघाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होणार आहे त्यामुळे सरसंघचालक मोहन भागवत आपल्या भाषणात स्वयंसेवकांना नेमका कोणता उपदेश करणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या कार्यक्रमाला माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद

### धम्मचक्र प्रवर्तन दिनाचीही जय्यत तयारी

संघाच्या दसरा मेळाव्यासोबतच दरवर्षी नागपुरात दसऱ्याच्या दिवशी दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या कार्यक्रमाचीदेखील जय्यत तयारी चालू आहे. 2 ऑक्टोबर रोजी नागपुरात पाऊस येण्याची शक्यता असल्याने या सोहळ्याला येणाऱ्या लाखो अनुयायांची व्यवस्था दीक्षाभूमीच्या परिसरातील शाळा, कॉलेज आणि समाज भवनानमध्ये केली जाणार आहे. त्यासाठी प्रशासनाने तयारी केली असून शाळा ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

**झेंडूला सर्वाधिक मागणी**

### मार्केट यार्डातील बाजार दोन दिवस रात्रीही सुरू

# दसऱ्यासाठी फूल बाजार बहरला!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दसऱ्यासाठी फूलबाजार बहरला असून, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात शेतकऱ्यांनी झेंडू मोठ्या प्रमाणावर विक्रीस पाठविला आहे. गुरुवारपर्यंत मार्केट यार्डातील घाऊक फूल बाजार दिवसा आणि रात्रीही सुरू राहणार असून, बुधवारी (१ ऑक्टोबर) झेंडूची आवक आणखी वाढणार आहे. मंगळवारी घाऊक बाजारात एक किलो ओल्या झेंडूला ३० ते ४० रुपये आणि चांगल्या प्रतीच्या सुक्या झेंडूला १०० ते १२० रुपये दर मिळाले आहेत.**

## बाजारात झेंडू मोठ्या प्रमाणावर विक्रीस



'दसऱ्याला सर्वाधिक मागणी झेंडू, गुलछडी, शेवंती, अष्टर या फुलांना असते. मार्केट यार्डातील फूलबाजारात मंगळवारपासून झेंडूची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू झाली. पुणे, सोलापूर, धाराशिव, बीड, हिंगोली परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर झेंडू विक्रीस पाठविला. पावसामुळे झेंडूच्या प्रतवारीवर परिणाम झाला. घरगुती ग्राहक आणि व्यापाऱ्यांकडून फुलांची खरेदी बुधवारी केली जाणार आहे. बुधवारी झेंडूची आवक आणखी वाढेल. यंदा झेंडूचे दर तेजीत राहणार असून, सुक्या झेंडूला चांगले दर मिळणार आहेत. किरकोळ बाजारात चांगल्या प्रतीच्या झेंडूचे दर १०० ते १५० रुपयांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे', अशी माहिती मार्केट यार्डातील फूल व्यापारी सागर भोसले यांनी दिली.'फुले खरेदीसाठी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात बुधवारी सकाळी मोठी गर्दी होईल.

पुणे शहर, उपनगरातील ग्राहका, तसेच किरकोळ बाजारातील फूल विक्रेत्यांची खरेदीसाठी गर्दी होईल. झेंडूची बुधवारी आवक आणखी वाढेल. गणेशोत्सव, दसरा, दिवाळीत फुलांना उच्चांकी मागणी असते. दसऱ्याला झेंडूला चांगले दर मिळतात. त्यामुळे शेतकरी झेंडूची फुले राखून ठेवतात', असे त्यांनी नमूद केले.यंदा पावसामुळे झेंडूचे मोठे नुकसान झाले. दसऱ्याला झेंडूला चांगले दर मिळतात. त्यामुळे शेतकरी झेंडू राखून ठेवतात. दसऱ्यापूर्वी झेंडूची तोड केली जाते. त्यानंतर बाजारात झेंडू विक्रीस पाठविला जातो.गुरुवारपर्यंत फुलबाजाराचे कामकाज अहोरात्र सुरू राहणार आहे. बुधवारी झेंडूची आवक

### झेंडूला १०० ते १२० रुपये दर

दसऱ्यापूर्वी झेंडूची तोड केली जाते. त्यानंतर बाजारात झेंडू विक्रीस पाठविला जातो. गुरुवारपर्यंत फुलबाजाराचे कामकाज अहोरात्र सुरू राहणार आहे. बुधवारी झेंडूची आवक आणखी वाढेल.दसऱ्यासाठी फूलबाजार बहरला असून, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात शेतकऱ्यांनी झेंडू मोठ्या प्रमाणावर विक्रीस पाठविला आहे. गुरुवारपर्यंत मार्केट यार्डातील घाऊक फूल बाजार दिवसा आणि रात्रीही सुरू राहणार असून, झेंडूची आवक आणखी वाढणार आहे.

आणखी वाढेलझेंडू, गुलछडी, शेवंती, अष्टर या फुलांना असते. मार्केट यार्डातील फूलबाजारात मंगळवारपासून झेंडूची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू झाली. पुणे, सोलापूर, धाराशिव, बीड, हिंगोली परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर झेंडू विक्रीस पाठविला. पावसामुळे झेंडूच्या प्रतवारीवर परिणाम झाला.

घरगुती ग्राहक आणि व्यापाऱ्यांकडून फुलांची खरेदी बुधवारी केली जाणार आहे. बुधवारी झेंडूची आवक आणखी वाढेल. यंदा झेंडूचे दर तेजीत राहणार असून, सुक्या झेंडूला चांगले दर मिळणार आहेत. किरकोळ बाजारात चांगल्या प्रतीच्या झेंडूचे दर १०० ते १५० रुपयांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे', अशी माहिती मार्केट यार्डातील फूल व्यापारी सागर भोसले यांनी दिली.'फुले खरेदीसाठी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात बुधवारी सकाळी मोठी गर्दी होईल. पुणे शहर, उपनगरातील ग्राहका, तसेच किरकोळ बाजारातील फूल विक्रेत्यांची खरेदीसाठी गर्दी होईल. झेंडूची बुधवारी आवक आणखी वाढेल. गणेशोत्सव, दसरा, दिवाळीत फुलांना उच्चांकी मागणी असते. दसऱ्याला झेंडूला चांगले दर मिळतात. त्यामुळे शेतकरी झेंडूची फुले राखून ठेवतात', असे त्यांनी नमूद केले. यंदा पावसामुळे झेंडूचे मोठे नुकसान झाले. दसऱ्याला झेंडूला चांगले दर मिळतात. त्यामुळे शेतकरी झेंडू राखून ठेवतात.

# पीएमपीला मोकळ्या भूखंडाची अपेक्षा का ?

## इलेक्ट्रिक बस दाखल होत असून मार्गिका विस्तार सुरू

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) ताफ्यात सीएनजी, इलेक्ट्रिक बस दाखल होत असून मार्गिका विस्तार सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर पीएमपी प्रशासनाने पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) जागेची मागणी केली आहे.**




त्यानुसार शहरातील धायरी, हवेली, हिंजवडी, तळेगाव, रांजणगाव येथील औद्योगिक भूखंड आणि विविध अनारक्षित ३० एकर मोकळे भूखंड द्यावे, अशा मागणीचे संबंधित विभागांना पत्र पाठवले आहे.शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था गतीमान आणि प्रवासी पूरक करण्यासाठी 'पीएमपी' प्रशासनात मोठे बदल करण्यात येत आहेत. तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने पीएमपीच्या ताफ्यात सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस दाखल होत असून नवीन मार्गिका आणि सेवेचा विस्तार करण्यात येत आहे. त्यानुसार सध्या पीएमपीच्या सुमारे ३८१ मार्गिकांपेक्षा जादा मार्गांचा विस्तार होत असून सध्या

### आगाऊ जागांची मागणी

तर बससाठी इंधन भरणे, इलेक्ट्रिक बस चार्जिंग आणि देखभाल-दुरुस्तीच्या सुविधा उपलब्ध असतील. अन्यथा, हजारो नव्या बस व्यवस्थापित करणे कठीण होईल, शिवाय प्रवाशांना विलंब आणि सेवा खंडित होऊ, नये म्हणून पूर्वनियोजनानुसार पुणे, पिंपरी चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, पीएमआरडीए आणि एमआयडीसीकडे आगाऊ जागांची मागणी करण्यात आली आहे.

ताफ्यात दोन हजार २०० बस संचलनात आहेत. यापैकी एक हजार पीएमपी सीएनजी इंधनावर आधारित असून, ३०० पीएमपी इलेक्ट्रिक आहेत, तर तर नव्या वर्षात आणखी दोन हजार ४०० नवीन पीएमपी ताफ्यात दाखल होणार आहे. त्यामुळे वाहतळळ व्यवस्था, चार्जिंग सुविधा, देखभाल दुरुस्ती, नवीन आगार, थांबे यांच्यासाठी जागा आवश्यक असल्याची माहिती पीएमपीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी दिली. नियोजन आवश्यक आहेत. सध्या ताफ्यात नव्याने पीएमपी दाखल होत असून जागांची कमरतता भासते आहे.

हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ | हाफकीन सक्षमीकरणासाठी

# पाच वर्षांचा रोड मॅप तयार करा- अजित पवार

## हाफकिनसाठी 25 कोटींचा निधी मंजूर

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हाफकीनच्या सक्षमीकरणासाठी ५ वर्षांचा रोडमॅप तयार करावा असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले आहे.**



आज हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या प्रश्नांसंदर्भात आणि संस्थेतील निवृत्त कर्मचारी तसंच अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी हाफकिनचे अधिकारी तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी अजित पवार म्हणाले लस निर्मितीच्या क्षेत्रात हाफकिन संस्थेचं मोलाचे योगदान राहिले असून देशातून पोलिओचं उच्चाटन करण्यामध्ये हाफकिनचा मोठा वाटा आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी आहे. या लसींची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकारातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.

हाफकिन इन्स्टिट्यूट आणि हापकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे सक्षमीकरण करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. या समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि नियोजन विभागाच्या सचिवांचा समावेश करावा. या समितीनं हाफकीनच्या सक्षमीकरणासाठी ५ वर्षांचा रोडमॅप तयार करावा, असे निर्देश बैठकीमध्ये संबंधितांना दिले.

### लसींची खरेदी हाफकीनकडून करा

सध्या हापकिनकडे सर्पदंशावरील दीड लाख लस तयार आहेत. सर्पदंशावरील हाफकिननं तयार केलेली लस प्रभावी आणि परिणामकारक आहे. या लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणानं हापकिनमार्फत करावी, अशा सूचना केल्या.

# आस्मानी संकटाच्या पार्श्वभूमीवर "शस्त्रपूजन सोहळा" रद्द !

## हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ यांची माहिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वात उंच पूर्णाकृती शिल्प अर्थात "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. नुकतीच शंभूसृष्टीला ऐतिहासिक मानवंदना सोहळा संपन्न झाला. त्याची 'लंडन बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये झाली आहे. येत्या दि. 2 ऑक्टोबर रोजी भव्य-दिव्य शस्त्रपूजन सोहळ्याचे नियोजन केले होते. मात्र, राज्यातील आस्मानी संकटाच्या पार्श्वभूमीवर सदर सोहळा रद्द केला आहे, अशी माहिती हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ यांनी दिली.**





हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून बोऱ्हाडेवाडी-मोशी येथे सुमारे 7.5 एकर क्षेत्रावर "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" चे काम सुरू आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन व राज्य शासनाच्या पुढाकाराने आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जागेत ही अभिमानास्पद शंभूसृष्टी आकाराला येत आहे.

गणेश भुजबळ म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे देव-देश अन् धर्मासाठी केलेले बलिदान, तेजस्वी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचले पाहिजेत. जगभरात आपल्या राजाच्या विचारांची जागृती झाली पाहिजे. राष्ट्रप्रति समर्पण भावनेतून काम करणारी तरुण पिढी तयार झाली पाहिजे. यासाठी हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या माध्यमातून आम्ही विविध उपक्रम, मोहीम हाती घेणार आहोत.

शंभूसृष्टी आणि "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण"ला ऐतिहासिक मानवंदना सोहळा अत्यंत दिमाखात झाला. संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील हिंदू बांधवांनी सोशल मीडियावर या सोहळ्याला दाद दिली. त्यानंतर आम्ही विजया दशमी दसऱ्याच्या निमित्ताने दि. 2 ऑक्टोबर रोजी भव्य शस्त्रपूजन सोहळा आयोजित केला होता. हा सोहळा लक्षवेधी होईल आणि शिव-शंभू विचारांचे सोने लुटले जाईल, असा संकल्प होता.

मात्र, राज्यात गेल्या काही दिवसांपासून अनेक जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाने झोडपले आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागात अक्षरशः ओला दुष्काळ पडला आहे. अनेक संसार उद्ध्वस्त झाले असून, शेतकरी हतबल झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये शस्त्रपूजन सोहळा रद्द करण्याचा निर्णय ट्रस्टने घेतला आहे, असेही गणेश भुजबळ यांनी सांगितले.

### मराठवाड्यासह राज्यातील महापूरग्रस्त 50 गावांत मदत करणार

" हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेप्रमाणे आम्ही शस्त्रपूजन सोहळा यावर्षी अत्यंत साधेपणाने करणार आहोत. पुढील वर्षी शस्त्रपूजन सोहळा शाही थाटात करण्यात येईल. आपल्या बळीराजावर आस्मानी संकट ओढावले आहे. त्यामुळे महापूरग्रस्त 50 गावांतील शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी आम्ही लोकसहभागातून मदतकार्य करणार आहोत.

**- गणेश भुजबळ,** उपाध्यक्ष,
हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड, पुणे.


# तरुणाई ऑनलाइन गेमिंगच्या विळख्यात?



## भूमिका

**गेल्या काही दिवसांपासून समाज माध्यमांवर हिमांशू मिश्रा या जेईई परीक्षा चांगल्या गुणांनी पास झालेल्या तरुणाचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यामागचं कारणही तसंच आहे. ऑनलाईन गेमच्या इतक्या आहारी गेला होता की वयाच्या २२ व्या वर्षी त्याच्यावर ९६ लाखांपेक्षा जास्त कर्ज झालं. त्याच्या या ऑनलाईन गेमच्या व्यसनापायी त्याच्या घरच्यांनी त्याच्याशी नातं तोडून टाकलं.**

त्याच्या वडिलांचं निधन झालं तर त्याला वडिलांचं अंत्यदर्शनही घेता आलं नाही. त्याच्या आईने त्याच्या या गोष्टीला कंटाळून त्याच्याशी आपलं कसलंही नातं नाही, असं जाहीर केलं आहे. 'मी रस्त्यावर मरून पडलो तरी घरचे मला बघायला येणार नाहीत' असंदेखील तो म्हणत आहे. हिमांशूच्या प्रकरणावरून नेटिझन्समध्ये दोन गट पडले आहेत. एका गटाचे म्हणणे आहे की हिमांशू खोटंनाटं सांगून सहानुभूती मिळवून लोकांकडून पैसे उकळतो. तर काहीजण त्याच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करत आहेत. पण हे प्रकरण खोटं असो किंवा खरं, पण हा व्हिडिओ व्हायरल झाला त्याखाली ज्या अनेक टिप्पण्या होत्या, त्या जास्त महत्त्वाच्या आहेत. कारण त्यात आपणही अशा पद्धतीने ऑनलाइल गेमिंगमधून पैसे हरल्याचे उल्लेख होते. माझे ८० हजार गेले, १२ लाख गेले, १५ लाखांना डुबलो आहे,



असं तिथं लोकानी सांगितलं आहे. यावरून हे समजतं की हिमांशूचं प्रकरण खोटं असो वा खरं पण ऑनलाईन गेमिंग, गॅम्बलिंगच्या आहारी जाऊन बरीच तरुणाई फसली चालली आहे.आज सगळ्यांकडे मोबाईल आणि इंटरनेट असतं. त्यात या ऑनलाईन गेमिंग, गॅम्बलिंगच्या जाहिरातीही झळकतात. त्या जाहिरातींमधून एखाद्या सेलिब्रिटीचा चेहरा दाखवला जातो आणि ते म्हणतात की मी ५० रु, १०० रु लावले आणि ५० हजार जिंकले, १ लाख जिंकले, १० लाख जिंकले. काही जाहिरातींमध्ये हा आकडा यापेक्षाही मोठा दाखवला जातो. म्हणजे मी सुरुवातीला १०० रु. ने खेळलो आणि एक कोटी जिंकले. तरुण पिढी अशा जाहिरातींकडे साहजिकच आकर्षली जाते. हल्ली समाज माध्यमांवरचे इतर लोकांचे चमकूपणा करणारे रील, व्हिडिओ पाहून आपलाही असाच रुबाब असावा असा विचार तरुणांच्या मनात घोळत असतो किंवा त्याचं त्यांना आकर्षण असतं. पण पुरेसे पैसे नसल्याने ते शौक पूर्ण करता येत नाहीत. मग अशा जाहिराती पाहून कमी वेळात झटपट पैसे कमवण्याचा मोह होतो. युट्यूबवरही असे अनेक व्हिडिओज आहेत ज्यामध्ये गेमिंग चॅनल चालवणारे युट्यूबर सर्रास सांगतात की ऑनलाईन गेम खेळून मी महिन्याला इतके कमवले. त्या पैशातून लक्झरी गाडी घेतली, परदेशीच फिरलो. याची भुरळ इतर तरुणांना लगेच पडते. ते पाहून गेम डाऊनलोड करतात. किंवा कोणीतरी लिंक शेअर केली असेल तर त्या लिंकद्वारे ॲप डाऊनलोड करतात किंवा ॲप नसेल तर वेबसाईटद्वारे हे गेम खेळले जातात. यामध्ये नवीन वापरकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी सुरुवातीला त्यांच्या गेमिंग वॅलेटमध्ये काही रक्कम वेलकम बोनस म्हणून जमा केली जाते. ती तुमच्या वॅलेटमध्ये दिसते पण ती तुम्ही काढू शकत नाही. पण तिचा वापर करून तुम्ही सुरुवातीला गेम खेळू शकता. खेळायला सुरुवात केल्यावर तुम्ही सतत जिंकत नाही. कधी ना कधी हरताच. हरणारा विचार करतो की जाऊ दे, कुठे माझे पैसे होते... गेले तर गेले. आता एकदा माझे पैसे लावून खेळतो. मग त्यात एखादा गेम जिंकला की त्याच्या मनात आणखी पैसे जिंकायची लालूच निर्माण होते. मग तरुण आणखी पैसे लावून गेम खेळू लागतात. हळूहळू त्याची सवय होऊन जाते.मग एखादा गेम, बेटिंग हरल्यावर ते पैसे वसूल करण्यासाठी पुन्हा पुन्हा पैसे लावून गेम खेळू लागतात. आणि इथेच ते त्या ऑनलाईन गेममध्ये गुरफटून जायला लागतात. एखादा दिवस खेळलं नाही तर ते सैरभैर होतात, सतत त्यांची चिडचिड होऊ लागते. आणि स्वत: जवळचे पैसे संपले तर घरातून पैसे मागायचे, नाही मिळाले तर बाहेरून उसने घ्यायचे वगैरे प्रकार सुरू होतात. पुढे हे इतके जास्त होते की झटपट श्रीमंत होण्याच्या नादात डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा राहतो. पण आपली चूक कळेपर्यंत उशीर झालेला असतो. मग मानसिक तणाव येतो.

## प्रासंगिक »

### अतिवाईटातील आशा

***मात्र हा करार करताना ना ट्रम्प यांनी 'हमास'शी चर्चेचा प्रयत्न केला, ना नेतान्याहू यांना त्याची गरज भासली. त्यामुळे या करारास 'हमास'ची मान्यता आहे का याबाबत अद्याप स्पष्टता नाही...***

अत्याचार, हिंसाचार करून करून थकलेला गावगुंड अखेर शांतिस्तोत्र गाऊ लागल्यास 'आता नव्याने कोणाचे जीव जाणार नाहीत' या आशेने या घटनेचे स्वागत करावे की त्याने केलेल्या अत्याचारांचा जमाखर्च कोण मांडणार या प्रश्नाने व्यथित व्हावे? हा प्रश्न पडतो तो अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या संगतीने भारतीय प्रमाणवेळेनुसार सोमवारी मध्यरात्री पॅलेस्टाइन परिसरात मोठ्या झोकात केलेली शस्त्रसंधीची घोषणा ऐकून. गेल्या हजारो वर्षांत इतकी चांगली घटना घडलेली नाहीत्यांच्या घोषणेचा अन्वयार्थ लावणे अधिक महत्त्वाचे. हमास या दहशतवादी संघटनेच्या ज्या अत्यंत निंदनीय कृतीमुळे इस्रायल नरभक्षकाप्रमाणे बेभान होऊन माणसे मारत सुटला.

आपल्याकडे एखाद्या विषयाची माहिती, वर्णन, मांडणी बहुदा एकांगी असते. ती कोण देते/ करते आहे यावर बरेच अवलंबून असते. असे अनेक विषय आहेत. त्यापैकी महत्वाचे दोन विषय म्हणजे गाव आणि शेतकरी समुदाय. या दोन्हीविषयी साहित्य, सिनेमा यामध्ये जे चित्र रंगविले जाते.

# गाव बदलत आहे... प्रश्न बदलाच्या दिशेचा

त्याचा अनुभव संबधितांना 'आपला' वाटत नाही आणि जे संबधित नसतात त्यांना त्यातून मनोरंजनाशिवाय इतर काही तपशील मिळत नाहीत. सैराट नावाचा चित्रपट प्रसिद्ध झाला आणि त्यानंतर त्यामध्ये बोलली गेलेली भाषा, पुढे अनेक टीव्ही मालिकांमधून किमान एक पात्र त्या ढंगाची भाषा बोलताना दिसू लागले दुसरीकडे खेड्यात तशी भाषा बोलणारे कमी होत आहेत. वीस पंचवीस वर्षापूर्वी शेतकरी नवरा -बायको हेच खरे रोमॅन्टिक जीवन जगत आहे असा भास होणारे चित्रपट, गाणी तयार होत होती. पुढे शेतकरी शेती करतो म्हणजे जणू काही त्याची अधोगतीच सुरू असल्याचा भास व्हावा असे चित्र रेखाटले गेले. त्याचप्रमाणे गावाचे सुद्धा चित्र रेखाटले जाते. जगातली सर्व भोळी भाबडी, माणुसकी असणारी माणसे गावात राहतात, गावकरी बेरकी असतात, गावचा पाटील सरपंच हा बाहेरख्याली असतो, पुढे तो भ्रष्टाचारी दाखविला जात असे. यावर अशी मांडणी करणाऱ्याचा दावा असा



असतो की, आम्ही खेड्यांतून,शेतकरी कुटुंबातून आलो आहोत. त्यामुळे आम्हाला हे काही शिकायची गरज नसते. आम्ही हे अनुभवले आहे. त्यामुळे इतरांना त्याविषयी काही अधिकार असता कामा नये.मागे एकदा शेती संशोधन सादरीकरणावेळी आलेला अनुभव नमूद करण्यासारखा आहे. शेती पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांचे संशोधन पूर्ण झाल्या नंतरचे सादरीकरण होते. त्या समितिमध्ये एक पुण्याच्या सदाशिव पेठेत जन्म झालेले आणि पुढे सांख्यिकी या विषयाचे प्राध्यापक सदस्य म्हणून उपस्थित होते. ते त्यांच्या विषयाच्या अनुषंगाने काही सूचना, बदल सुचवत होते. काही वेळा अनुमान चुकीचे ठरवत होते. विषय अंगलट येत आहे असे कळाल्या नंतर इतर प्राध्यापकानी त्यांचे "नाव" घेऊन त्यांना असे सुनावले की आपल्याला भुईमुगाला शेंगा कुठे लागतात हे माहीत आहे का? त्या प्रश्नावर त्यांची खिल्ली उडवायला सुरुवात केली. त्यावर ते उत्तरले माझा तो विषय नाही. मी, जो तपशील दिला आहे आणि त्याचे जे पृथ:करण केले आहे याविषयी बोलतो आहे. त्यांचे कोणी ऐकण्याच्या मनस्थिती नव्हते. त्यामुळे त्यांच्या सूचनांचे काय झाले असेल याचा अंदाज येतोच. अशा पद्धतीने विषयाला बगल दिली जाते. मागे एकदा रोजगार हमीमध्ये खूप मोठे काम उभे करणाऱ्या एका कार्यकर्तीला मी गमतीने सूचना केली होती की आपण केवळ आडनाव बदलले तर आपण जे सांगत आहात हे आपले अनुभव आहेत असे लोकांना वाटेल आणि ते आपल्या कार्य-अभ्यासापेक्षा जास्त प्रभावी ठरेल. अशी भूमिका ठेवून त्याची मांडणीसाठी 'अनुभव' ही पूर्वअट ठेवण्याचा खूप मोठा विपरीत परिणाम असा होतो की अभ्यासक म्हणून जे अभ्यास करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## संघटनांचा दबाव वाढला

## परभणी जिल्ह्यातून शेतकऱ्यांसह पक्ष

# शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार मदत द्या!

## शेतकऱ्यांचा सोमवारी बैलगाडी मोर्चा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाईपोटी हेक्टरी ५० हजार रुपये देण्यात यावेत, अशी मागणी आता जोर धरत असून विविध पक्ष, संघटना या संदर्भात आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. दरम्यान परभणीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीनेही तसा ठराव वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतला असून तो शासनाकडे पाठवला आहे, तर याच मागणीसाठी पूर्णा येथे बैलगाडी मोर्चा काढण्यात आला.**



बाजार समितीच्या सभागृहात सभापती पंढरीनाथ घुले यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने ५० हजार रुपये हेक्टरी मदत करावी, असा ठराव या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. याशिवाय शेतकरी संघटना, सेलू तालुका दबाव गट, अशा विविध संघटनांनी ही मागणी केली आहे. पूर्णा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा सोमवारी बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. मोठ्या प्रमाणात बैलगाड्या घेऊन शेतकरी सहभागी झाले होते. यामुळे पूर्णा-नांदेड रस्त्यावरील वाहतूक काही तास ठप्प झाली होती. हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी यावेळी प्रशासनाकडे शेतकऱ्यांनी केली. यावेळी शेतकऱ्यांनी संतप्त घोषणाबाजी केली. तहसीलदार माधवराव बोथीकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शेतकऱ्यांच्या खात्यात मदत त्वरित द्यावी, तालुक्यात मुसळधार पावसामुळे कापूस, सोयाबीन, तूर, संत्रा व मोसंबी या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या पशुधनाचेही नुकसान झाले आहे त्यांनाही तातडीने अर्थसाह्य करावे अशी मागणी यावेळी केली. यासह इतर मागण्यांसाठी शेतकरी संघटनेतर्फे आंदोलने सुरू असून, शासनाने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला. या निवेदनावर गोविंद जोशी, पंडितराव शिंदे, संपतराव कटारे, रामराव शिंदे, मदनराव शिंदे आदींसह अनेक शेतकऱ्यांनी स्वाक्षरी केली आहे. प्रहारचे भीक मागो आंदोलन राज्यातील शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला असताना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सरकारकडे पैसे नसल्याने कर्जमाफी करणे शक्य नाही असे वक्तव्य केले. या वक्तव्याचा प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करीत संपूर्ण शहरामध्ये फेरी काढण्यात आली.

या फेरीमध्ये प्रती व्यक्ती एक रुपया प्रमाणे भीक मागून पडत्या पावसात शहरात भीक मागो आंदोलन केले होते. यातून जमलेली चिल्लर प्रहारचे जिल्हाध्यक्ष शिवलिंग बोधने यांनी जिल्हा प्रशासनाला दिली. बाजार समितीच्या सभागृहात सभापती पंढरीनाथ घुले यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने ५० हजार रुपये हेक्टरी मदत करावी, असा ठराव या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. याशिवाय शेतकरी संघटना, सेलू तालुका दबाव गट, अशा विविध संघटनांनी ही मागणी केली आहे. पूर्णा तहसील कार्यालयावर

## ५० हजार रुपये हेक्टरी मदत

बाजार समितीच्या सभागृहात सभापती पंढरीनाथ घुले यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने ५० हजार रुपये हेक्टरी मदत करावी, असा ठराव या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. याशिवाय शेतकरी संघटना, सेलू तालुका दबाव गट, अशा विविध संघटनांनी ही मागणी केली आहे.पूर्णा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा सोमवारी बैलगाडी मोर्चा काढण्यात आला.

शेतकऱ्यांचा सोमवारी बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. मोठ्या प्रमाणात बैलगाड्या घेऊन शेतकरी सहभागी झाले होते. यामुळे पूर्णा-नांदेड रस्त्यावरील वाहतूक काही तास ठप्प झाली होती. हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी यावेळी प्रशासनाकडे शेतकऱ्यांनी केली. यावेळी शेतकऱ्यांनी संतप्त घोषणाबाजी केली. तहसीलदार माधवराव बोथीकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शेतकऱ्यांच्या खात्यात मदत त्वरित द्यावी, तालुक्यात मुसळधार पावसामुळे कापूस, सोयाबीन, तूर, संत्रा व मोसंबी या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या पशुधनाचेही नुकसान झाले आहे त्यांनाही तातडीने अर्थसाह्य करावे अशी मागणी यावेळी केली. यासह इतर मागण्यांसाठी शेतकरी संघटनेतर्फे आंदोलने सुरू असून, शासनाने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला. या निवेदनावर गोविंद जोशी, पंडितराव शिंदे, संपतराव कटारे, रामराव शिंदे, मदनराव शिंदे आदींसह अनेक शेतकऱ्यांनी स्वाक्षरी केली आहे. प्रहारचे भीक मागो आंदोलन राज्यातील शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला असताना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सरकारकडे पैसे नसल्याने कर्जमाफी करणे शक्य नाही असे वक्तव्य केले. या वक्तव्याचा प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करीत संपूर्ण शहरामध्ये फेरी काढण्यात आली. या फेरीमध्ये प्रती व्यक्ती एक रुपया प्रमाणे भीक मागून पडत्या पावसात शहरात भीक मागो आंदोलन केले होते. यातून जमलेली चिल्लर प्रहारचे जिल्हाध्यक्ष शिवलिंग बोधने यांनी जिल्हा प्रशासनाला दिली.

# राज्यात ओला दुष्काळ नाही!

## मदतीचा निर्णय पुढील आठवड्यात, दिवाळीपूर्वी मदत मिळणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असली तरी ओला दुष्काळ अशी संकल्पनाच नसल्याचे सांगत सरकारने मंगळवारी विरोधकांची मागणी फेटाळून लावली.**



राज्यातील बळीराजावर कोसळलेल्या अभुतपूर्व संकटाच्या पार्श्वभूमीवर दुष्काळातील सर्व सुविधा आणि उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.येत्या दोन तीन दिवसात नुकसानीचे आकडे आल्यानंतर मदतीबाबत एक सर्वंकष धोरण तयार करून शेतकऱ्यांना भरीव मदत दिली जाईल.या सर्व मदतीची घोषणा पुढच्या आठवड्यात केली जाईल. विशेषतः शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी सर्व मदत देण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील अतिवृष्टी आणि पूरस्थितीवर सविस्तर चर्चा झाली. सरकार पूरग्रस्ताच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. या भागातील शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाई प्रमाणेच सर्व

## कर्ज वसूली थांबवली

आवश्यक वस्तूंचे कीट वितरित करण्यात येत आहे. विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, अशा केंद्र सरकारच्या निकषाबाहेर जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे दोन-तीन दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्राला प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली.आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबवावी, असे आदेशही बँकांने दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले. शेतकरी सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांना वसुली थांबवण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

**इस्रायलची मान्यता** जगभरातून स्वागत; 'हमास'च्या उत्तराची प्रतीक्षा

# गाझासाठी ट्रम्प यांचा शांततेचा प्रस्ताव!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मागील दोन वर्षांत हजारो लोकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेला इस्रायल-हमास संघर्ष संपुष्टात यावा, यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी २० मुद्द्यांचा समावेश असलेला शांततेचा प्रस्ताव जाहीर केला. ट्रम्प यांच्या प्रस्तावाला इस्रायलने मान्यता दिली आहे, तर यावर अभ्यास करून प्रतिसाद देऊ, अशी प्रतिक्रिया हमासने दिली आहे.**

## इस्रायलला अमेरिकेचा पूर्ण पाठिंबा



हा प्रस्ताव हमासने धुडकावला, तर हमासचा पराभव करण्यासाठी इस्रायलला अमेरिकेचा पूर्ण पाठिंबा असेल, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे.इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी ट्रम्प यांची व्हाइट हाऊस येथे भेट घेतली. त्यावेळी हा प्रस्ताव जाहीर करण्यात आला.त्यानुसार युद्धग्रस्त पॅलेस्टिनी भूभागात तात्पुरते प्रशासकीय मंडळ तयार करण्यात येणार असून, त्याचे नेतृत्व खुद्द डोनाल्ड ट्रम्प करणार आहेत. ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांचाही या मंडळात समावेश असेल. या नियोजनानुसार, गाझामधील लोकांना दुसरीकडे विस्थापित होण्याची गरज नाही. युद्धविराम लागू झाल्यानंतर ७२ तासांत हमासने ओलीस ठेवलेले इस्रायली नागरिक जिवंत अथवा मृत परत द्यावेत; तसेच पॅलेस्टाइनमधील प्रशासनात हमासला यापुढे कुठलीही भूमिका बजावता येणार नाही, असेही या प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले आहे.कतारचे पंतप्रधान आणि इजिप्तच्या गुप्तचर विभागाच्या प्रमुखांनी हा प्रस्ताव हमासबरोबर चर्चा करणाऱ्यांना दाखवला. त्यानंतर गाझातील प्रशासनामध्ये पुन्हा येणार नसल्याचे 'हमास'ने मान्य केल्याची चर्चा आहे. मात्र, हा गट निःशस्त्र होण्यास राजी नसल्याचे समजते.

गाझामधील संघर्ष संपविण्यासाठी ट्रम्प यांनी केलेल्या सर्वसमावेशक नियोजनाच्या घोषणेचे आम्ही स्वागत करतो. इस्रायल आणि पॅलेस्टिनी नागरिक आणि विस्तृत अशा पश्चिम आशियाच्या क्षेत्रामध्ये दीर्घकालीन शांतता, सुरक्षा आणि विकासासाठी हा व्यवहार्य मार्ग आहे.आपण शांततेच्या खूप जवळ आहोत. पॅलेस्टिनी जनतेने हा शांततेचा प्रस्ताव स्वीकारावा अन्यथा त्यांच्या स्वतःच्या भवितव्याची जबाबदारी स्वतःच घ्यावी. अद्याप सारे काही संपलेले नाही. 'हमास'ने हा प्रस्ताव नाकारला किंवा प्रस्ताव स्वीकारून नंतर त्यांना हवे तसे वागू लागले, तर इस्रायल स्वतःच त्यांना संपविण्याचे उरलेले काम पूर्ण करेल'गाझामधील संघर्ष संपावा, यासाठी आखलेल्या नियोजनाला पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख फील्ड मार्शल आसिम मुनिर यांनी १०० टक्के पाठिंबा दिला आहे,' असेही अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले. गाझामधील शांततेसाठी सुरू असलेल्या चर्चेत इतर जागतिक नेत्यांबरोबरच पाकिस्तानचे हे दोन्ही नेते सुरुवातीपासून सक्रिय सहभागी होते, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. पाकिस्तानबरोबरच ट्रम्प यांनी सौदी अरेबिया, कतार, यूएई, जॉर्डन, तुर्कीये या देशांचेही आभार मानले.हा प्रस्ताव हमासने धुडकावला, तर हमासचा पराभव करण्यासाठी इस्रायलला अमेरिकेचा पूर्ण पाठिंबा असेल, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे.इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी ट्रम्प यांची व्हाइट हाऊस येथे भेट घेतली. त्यावेळी हा प्रस्ताव जाहीर करण्यात आला. त्यानुसार युद्धग्रस्त पॅलेस्टिनी भूभागात तात्पुरते प्रशासकीय मंडळ तयार करण्यात येणार असून, त्याचे नेतृत्व खुद्द डोनाल्ड ट्रम्प करणार आहेत. ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांचाही या मंडळात समावेश असेल. या नियोजनानुसार, गाझामधील लोकांना दुसरीकडे विस्थापित होण्याची गरज नाही. युद्धविराम लागू झाल्यानंतर ७२ तासांत हमासने ओलीस ठेवलेले इस्रायली नागरिक जिवंत अथवा मृत परत द्यावेत; तसेच पॅलेस्टाइनमधील प्रशासनात हमासला यापुढे कुठलीही भूमिका बजावता येणार नाही, असेही या प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले आहे.

## नियोजनाच्या घोषणेचे स्वागत


कतारचे पंतप्रधान आणि इजिप्तच्या गुप्तचर विभागाच्या प्रमुखांनी हा प्रस्ताव हमासबरोबर चर्चा करणाऱ्यांना दाखवला. त्यानंतर गाझातील प्रशासनामध्ये पुन्हा येणार नसल्याचे 'हमास'ने मान्य केल्याची चर्चा आहे. मात्र, हा गट निःशस्त्र होण्यास राजी नसल्याचे समजते.गाझामधील संघर्ष संपविण्यासाठी ट्रम्प यांनी केलेल्या सर्वसमावेशक नियोजनाच्या घोषणेचे आम्ही स्वागत करतो.

# बिहारची अंतिम मतदारयादी प्रसिद्ध

## एकूण 68.5 लाख मतदार वगळले, 21.53 लाख नवीन जोडणी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी बिहारची अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली. त्यानुसार, बिहारमध्ये मतदारांची एकूण संख्या ७.४२ कोटी असल्याचे दिसते. राज्यात नुकत्याच पार पडलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीनंतर ही अंतिम यादी जाहीर करण्यात आली आहे. २४ जूनला एसआयआरला सुरुवात करण्यापूर्वी राज्यात नोंदणी करण्यात आलेल्या मतदारांची संख्या ७.८९ कोटी इतकी होती.**



दोन मतदारयाद्यांमध्ये फरक पाहिला तर राज्यातील मतदारांची संख्या ४७ लाखांनी घटल्याचे दिसून येते. हा फरक साधारण सहा टक्के इतका आहे. एसआयआरनंतर निवडणूक आयोगाने १ ऑगस्टला प्रसिद्ध केलेल्या मसुदा यादीनुसार, राज्यातील ६५ लाख मतदारांची नावे वगळली गेली होती. ही नावे मृत्यू, कायमस्वरूपी स्थलांतर किंवा दुबार नोंदणी या कारणांवरून वगळण्यात आली होती.

मसुदा यादी प्रसिद्ध झाल्यानंतर हरकती आणि दावे यासाठी निवडणूक आयोगाने दोन महिन्यांची मुदत दिली होती. या काळात २१ लाख ५३ हजार मतदारांची नावे मसुदा यादीत नव्याने जोडली गेली. त्याचवेळी आणखी ३.६६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. म्हणजेच या काळात एकूण १७.८७ लाख नावे जोडण्यात आली.१ ऑगस्टला प्रसिद्ध झालेल्या मसुदा यादीतून वगळलेल्या ६५ लाखांपैकी २२ लाख जणांचा मृत्यू झाल्याचे दाखवण्यात आले होतर सात लाख मतदारांनी दुसरीकडे मतदार म्हणून नावनोंदणी केली होती.

## परदेशी नागरिक नगण्य

अंतिम यादीमध्ये वगळ्या गेलेल्या मतदारांमध्ये किती परदेशी नागरिक होते हे निवडणूक आयोग किंवा राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केले नाही. मात्र सूत्रांनी द इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार वगळलेली जवळपास ९९ टक्के नावे ही मृत, कायमचे स्थलांतरित किंवा दुबार मतदारांची आहेत. त्यामुळे परदेशी नागरिकांची नावे यादीत फारशी नव्हती असे दिसत आहे.

# सांस्कृतिक परंपरेचा खजिना म्हणजे दसरा..!

**हिंदूंचा एक प्रमुख सण आणि शुभ दिवस. आश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी किंवा दसरा म्हणतात. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत देवीचे नवरात्र असते. याची समाप्ती या दिवशी होते. शुंभ, निशुंभ, रक्तबीज, महिषासूर या राक्षसांना मारण्यासाठी दुर्गेने चंडीचा अवतार घेतला आणि नऊ दिवस या राक्षसांबरोबर युद्ध केले.**

दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' असं म्हणत विजयादशमीचा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवरात्राचा शेवटचा दिवस म्हणजे दसरा. ९ दिवस अधिष्ठान केलेल्या देवीने महिषासूर राक्षसाचा या दिवशी वध केला, असे म्हटले जाते. तसेच रामानेही याच दिवशी रावणाचा वध केल्याने या सणाला विजयादशमी असेही म्हटले जाते. रावणाचे दहन म्हणजेच वाईट वृत्तींचे दहन या दिवशी करावे, असे मानले जाते. या दिवशी घरोघरी पूजा-अर्चा करुन शस्त्रांची, लक्ष्मीची आणि घरातील वाहनांची मनोभावे पूजा केली जाते. झेंडूची फुले आणि आंब्याची पाने यांना आजच्या दिवशी विशेष महत्त्व आहे. दाराला झेंडूच्या फुलांचे तोरण बांधले जाते. तसेच आपट्याची पाने सोने म्हणून लुटणे ही पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे. वाचकहो, एकमेकांना ही आपट्याची पाने देऊन तुमच्या कुटुंबात भरभराट होवो. आपण आमच्यासाठी लाख मोलाचे आहात. म्हणून 'सोनं घ्या आणि सोन्यासारखे राहा'! दसऱ्याच्या दिवशी गावाच्या सीमा ओलांडून जाण्याची प्रथा प्रचलित आहे . लोक या दिवशी परस्परांनासोने म्हणून आपट्याची पाने देतात. सायंकाळी गावाची सीमा ओलांडून ईशान्येस जायचे, शमीच्या किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करायची, तेथे अष्टदल रेखाटून त्यावर अपराजिता देवीची स्थापना करावयाची आणि तिला प्रार्थना करावयाची की, मला विजयी कर. त्यानंतर योद्ध्यांनी शस्त्र पूजन, व्यापाऱ्यांनी व्यापारासाठी प्रयाण व विद्यार्थ्यांनी सरस्वतीपूजन करायचे अशी प्रथा होती. मुले पाटीवर सरस्वतीचे प्रतीकात्मक चित्र काढून त्या पाटीची पूजा करतात. पुस्तकांची आणि वह्यांचीही पूजा होते. दशमीला महिषासुराचा तिने वध करून अंतिम विजय संपादन केला, म्हणून या दिवशी आनंदोत्सव साजरा करतात. आश्विन शुद्ध दशमीच्या दिवशी आकाशात तारका दिसू लागताच विजय नावाचा मुहूर्त असतो व त्यावेळी जे काम हाती घ्यावे त्यात यश मिळते, असे पुराणात सांगितले आहे. चैत्र पाडवा (चैत्र शुद्ध प्रतिपदा), अक्षय्य तृतीया (वैशाख शुद्ध तृतीया), विजयादशमी व दिवाळीचा पाडवा (कार्तिक शुद्ध प्रतिपदा, अर्धा मुहूर्त) या हिंदूंच्या साडेतीन विशेष शुभ मुहूर्तातील हा एक आहे. विजयादशमीला 'दसरा' असे म्हटले जाते. याच दिवशी रामाने रावणाचा वधही केला होता असे म्हणतात. रावणाचे दहन केले म्हणूनच वाईट वृत्तींचे दहन या दिवशी करावे असे मानले जाते. दसऱ्याच्या दिवसाला सीमोल्लंघन म्हणूनही ओळखले जाते. कारण अनेक शूर, पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राज्यावर स्वारी करण्यास जात असत, त्याला सीमोल्लंघन म्हणत. म्हणून हा दिवस सीमोल्लंघन म्हणून ओळखला जातो. आपल्या गावाची वेस ओलांडून जाणे याचा अर्थ सीमेचे उल्लंघन करणे. या दिवशी शमी किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करतात. शमी वृक्षाजवळच भूमीवर अपराजिता देवीची मूर्ती रेखाटून तिचीही पूजा करतात. रावणाचा वध करण्यासाठी रामाने याच दिवशी शमीचे पूजन करून प्रस्थान ठेवले. अर्जुनाने अज्ञातवास संपवून याच दिवशी शमीचे पूजन केले व आपली शस्त्रे पुन्हा हातात घेतली. पुर्वीच्या काळी दसऱ्याच्या दिवशी विजयोत्सव असल्याने राजे महाराजे आपल्या घोड्यांना सुशोभित अलंकार घालत असतं नंतर निराजन नावाचा विधी करत, शस्त्रास्त्रांचे पूजन करत आणि मग पुढच्या लढाईत विजय मिळवण्यासाठी प्रस्थान करत असे सांगितले जाते. कौत्सासाने चौदा कोटी सुवर्णमुद्रा देण्यासाठी रघुराजाने कुबेरावर स्वारी केली. त्यामुळे भयग्रस्त होऊन कुबेराने दसऱ्याच्या दिवशी शमीच्या झाडावर सुवर्णवृष्टी केली. आवश्यक तेवढे सोने रघुराजाने कौत्सास देऊन बाकीचे त्याने नागरिकांना वाटले अशी कथा स्कंदपुराणात आहे. या दिवशी सोने लुटण्याच्या प्रथेचा संबंध याच कथेशी आहे. साधारणपणे त्रेतायुगापासुन साजरा केला जाणारा विजयादशमी म्हणजेच दसरा हा सण असून, या सणाला हिंदू धर्मामध्ये अनन्य साधारण महत्त्व आहे. आश्विन शुद्ध दशमी म्हणजेच विजयादशमी. असे म्हणतात की, याच दिवशी भगवान रामाचा पूर्वज रघू या आयोध्याधीश राजाने विश्वजित यज्ञ केला होता. त्या काळापासून म्हणजे त्रेतायुगापासून हिंदू लोक विजयादशमी महोत्सव साजरा करतात. दसऱ्याला शमी वृक्ष पूजनाला विशेष महत्त्व आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसात प्रत्येक दिवशी संध्याकाळी शमी वृक्षपूजन केल्याने आरोग्य व धन संपत्ती प्राप्त होते अशी मान्यता आहे. या वृक्षाला अश्मंतक असेही म्हणतात. आपट्याची पाने पित्त व कफ दोषांवर गुणकारी आहेत. विजयादशमीला आपट्यांची पाने एकमेकांना दिली जातात. यालाच सोने लुटणे असेही म्हणतात.



'दसरा' हा प्रारंभी एक कृषीविषयक लोकोत्सव होता. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यावेळी शेतकरी हा उत्सव साजरा करत असत. विजयादशमीला शस्त्र आणि शास्त्र पूजन करण्याविषयी वेगवेगळे महत्त्व आहे. प्राचीन काळापासून क्षत्रिय युद्धाला जाण्यासाठी या दसरा या दिवसाची निवड करत होते. त्यांचे मानणे असे होते की, दसर्यासच्या दिवशी केलेल्या युद्धात निश्चितच विजय मिळतो. क्षत्रियांप्रमाणे ब्राह्मण लोकही दसरा या दिवशी विद्या ग्रहण करण्यासाठी घराबाहेर पडत. तसेच व्यापारी लोक विजयादशमीच्या या पवित्र दिवशी नवीन दुकान, शोरूम इत्यादींचा शुभारंभ करणे शुभ मानतात. नवरात्र स्पेशल घरच्या घरी तयार करा बीटाचा हलवा नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखालच्या ताटात नऊ धान्यांची पेरणी करतात व दसर्या्च्या दिवशी त्या धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात. कित्येक ठिकाणी शेतातल्या भाताच्या लोंब्या तोडून आणून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. ही प्रथादेखील या सणाचे कृषीविषयक स्वरूपच व्यक्त करते. पुढे याच सणाला धार्मिक स्वरूप दिले गेले आणि इतिहासकाळात तो एक राजकीय स्वरूपाचा सण ठरला.

विजयी सलामी

## राणा-दीप्ती-अमनजोतची उत्कृष्ट कामगिरी

# भारताच्या लेकींची विजयी सलामी!

## श्रीलंकेला केलं ऑलआऊट

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने श्रीलंकेचा पराभव करत महिला एकदिवसीय विश्वचषकाला विजयाने सुरूवात केली आहे. महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ ला आजपासून म्हणजेच ३० सप्टेंबरपासून सुरूवात झाली आहे. यजमान भारतीय संघाने श्रीलंकेविरूद्ध सामन्याने मोहिमेला सुरूवात केली. टीम इंडियाने सांघिक कामगिरीच्या जोरावर या सामन्यात विजय मिळवला आहे.**



### देओल ४८ धावांची खेळी

भारताची सुरूवात फारशी चांगली नाही कारण, स्मृती मानधना अवघ्या ८ धावा करत बाद झाली. यानंतर प्रतिका रावल व हरलीन देओल यांनी संघाचा डाव सावरला. प्रतिका रावल ३७ धावा तर हरलीन देओल ४८ धावांची खेळी केली. तर हरमन झटपट २१ धावा करत बाद झाली. यानंतर दीप्ती शर्मा व अमनजोत कौर यांनी शतकी भाहीदारी केली आणि संघाचा डाव सावरला.

भारताने श्रीलंकेला २११ धावांवर सर्वबाद करत ५९ धावांनी डीएलएसप्रमाणे विजय मिळवला. भारताच्या डावात ३ वेळा पावसाच्या व्यत्ययामुळे सामना थांबला आणि त्यामुळे सामना हा ४७ षटकांचा करण्यात आला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद २६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ ९ चेंडू शिल्लक ठेवत २११ धावांवर सर्वबाद झाला.भारताने दिलेल्या २७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने सावध सुरूवात केली. पण भारताच्या गोलंदाजीसमोर फार काळ टिकू शकले नाही. हसीनी परेराला क्रांती गौडने बाद करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. तर दीप्ती शर्माने चमारी अट्टापट्टूला ४३ धावांवर बाद करत सर्वात मोठी विकेट मिळवली. यानंतर ठराविक अंतराने श्रीलंकेने विकेट्स गमावल्या.श्रीलंकेच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. श्रीलंकेकडून ४० वर्षीय प्रबोधनीने २ विकेट्स घेतल्या. तर फिरकीपटू रानावीरा हिने एका षटकात ३ विकेट्स घेतल्या आणि संपूर्ण सामन्यात ४ विकेट्स घेतल्या. तर कुलासूर्या व चमारी यांनी १-१ विकेट्स घेतल्या.१२६-६ तत्पूर्वी श्रीलंकेने नाणेफेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारताची सुरूवात फारशी चांगली नाही कारण, स्मृती मानधना अवघ्या ८ धावा करत बाद झाली. यानंतर प्रतिका रावल व हरलीन देओल यांनी संघाचा डाव सावरला. प्रतिका रावल ३७ धावा तर हरलीन देओल ४८ धावांची खेळी केली. तर हरमन झटपट २१ धावा करत बाद झाली. यानंतर दीप्ती शर्मा व अमनजोत कौर यांनी शतकी भाहीदारी केली आणि संघाचा डाव सावरला. अमनजोत कौरला श्रीलंकेकडून तीन वेळा जीवदान मिळालं, ज्याचा तिने चांगला फायदा करून घेतला आणि अर्धशतकी खेळी केली. अमनजोतने ५६ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ५७ धावांची खेळी केली. तर दीप्ती शर्माने ५३ चेंडूत ४ चौकारांसह ५३ धावा केल्या. याशिवाय अखेरच्या २ षटकांमध्ये फलंदाजीला आलेल्या स्नेह राणाने उत्कृष्ट फटकेबाजी करत १५ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह २८ धावांची खेळी केली. यासह भारताने २६९ धावा केल्या.भारताकडून दीप्ती शर्माने ३ विकेट्स घेतल्या. दीप्तीने अर्धशतक आणि नंतर गोलंदाजीत ३ विकेट्स घेत अष्टपैलू कामगिरीसह सामनावीराच पुरस्कार पटकावला. याशिवाय श्रीचरणी व स्नेह राणाने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तर क्रांती गौड, अमनजोत व प्रतिका रावल यांनी १-१ विकेट्स घेतल्या.भारताने श्रीलंकेला २११ धावांवर सर्वबाद करत ५९ धावांनी डीएलएसप्रमाणे विजय मिळवला. भारताच्या डावात ३ वेळा पावसाच्या व्यत्ययामुळे सामना थांबला आणि त्यामुळे सामना हा ४७ षटकांचा करण्यात आला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद २६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ ९ चेंडू शिल्लक ठेवत २११ धावांवर सर्वबाद झाला.भारताने दिलेल्या २७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने सावध सुरूवात केली. पण भारताच्या गोलंदाजीसमोर फार काळ टिकू शकले नाही. हसीनी परेराला क्रांती गौडने बाद करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. तर दीप्ती शर्माने चमारी अट्टापट्टूला ४३ धावांवर बाद करत सर्वात मोठी विकेट मिळवली. यानंतर ठराविक अंतराने श्रीलंकेने विकेट्स गमावल्या.श्रीलंकेच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. तर फिरकीपटू रानावीरा हिने एका षटकात ३ विकेट्स घेतल्या आणि संपूर्ण सामन्यात ४ विकेट्स घेतल्या. तर कुलासूर्या व चमारी यांनी १-१ विकेट्स घेतल्या.१२६-६ तत्पूर्वी श्रीलंकेने नाणेफेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं.

# भारताला ट्रॉफी कधी मिळणार?

## ACCच्या बैठकीत राजीव शुक्लांनी मोहसीन नक्वींना सुनावलं

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धा पार पडल्यानंतर आशियाई क्रिकेट परिषदेची बैठक घेण्यात आली. या बैठकीत बीसीसीआयने पीसीबीचे मुख्य मोहसीन नक्वी यांना चांगलंच सुनावलं आहे. मंगळवार, ३० सप्टेंबर रोजी झालेल्या आशियाई क्रिकेट परिषदेच्या बैठकीत भारताने आशिया कपच्या अंतिम वादावर तीव्र आक्षेप नोंदवला आणि ACC अध्यक्ष तसेच पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नकवी यांना चांगलेच प्रश्न विचारले.**




### ट्रॉफी भारताकडे सुपूर्द होणे आवश्यक

बैठकीदरम्यान नक्वी यांनी भारताच्या विजयानंतरदेखील भारताचं अभिनंदनही केलं नाही. अखेर बीसीसीआयचे प्रतिनिधी आशिष शेलार यांनी दबाव आणल्यानंतर नक्वी यांनी अनिच्छेने भारताला विजयाच्या शुभेच्छा दिल्या. मात्र बीसीसीआयनेआपली भूमिका ठाम ठेवत स्पष्ट केलं की विजेतेपदाची ट्रॉफी भारताकडे अधिकृतरीत्या सुपूर्द होणे आवश्यक आहे.

अंतिम सामन्यानंतर भारताने नकवी यांच्याकडून विजेतेपदाची ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला होता, त्यानंतर नकवी यांनी ती ट्रॉफी स्वतःकडेच ठेवली. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व करताना नक्वी यांना खणखणीत प्रश्न विचारले. शुक्ला यांनी स्पष्ट केलं

की ट्रॉफी ही ACC ची मालमत्ता आहे, नक्वींची वैयक्तिक नाही. तरीही नक्वी यांनी ती आपल्या हॉटेलच्या खोलीत नेली.शुक्ला यांनी सांगितलं की ट्रॉफी भारताला अधिकृत पद्धतीने सुपूर्द करणं आवश्यक आहे आणि ACC ने हा मुद्दा तात्काळ सोडवायला हवा. यानंतर नक्वी आणि बीसीसीआय यांच्यात मोठा वाद झाला. नकवी यांनी सांगितलं की, या संपूर्ण प्रकारात ते "एखाद्या कार्टूनप्रमाणे दिसलो"

. तसेच त्यांनी असा दावा केला की भारतीय संघाने लेखी स्वरूपात कुठेही दिलं नव्हतं की ते त्यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारणार नाहीत. बीसीसीआयचे प्रतिनिधी सातत्याने प्रश्न विचारत राहिले असता, नक्वी यांनी उत्तर दिले की हे मुद्दे या बैठकीत नव्हे तर वेगळ्या व्यासपीठावर चर्चिले जातील.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार।
। दि. 1 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### पीसीयू व दक्षिण कोरिया यांच्यातील विद्यार्थी आदानप्रदान कार्यक्रमांना चालना

# पीसीयू–कोस्मे सामंजस्य करार शैक्षणिक प्रगतीचा नवा अध्याय - हर्षवर्धन पाटील

## शिक्षण विश्व: "कोस्मे"सोबत सहकार्य करणारे पीसीयू पश्चिम महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दक्षिण कोरियाने शैक्षणिक, तांत्रिक, औद्योगिक प्रगती केली आहे. कोस्मे - पीसीयू यांच्या मध्ये झालेल्या शैक्षणिक सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना हे ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळाली आहे. त्यासाठी पीसीयू व दक्षिण कोरिया यांच्यातील विद्यार्थी आदानप्रदान कार्यक्रमांना चालना दिली जाईल. .**






कोरियन भाषा शिक्षण सुरू करण्यासाठी सहाय्य करून दक्षिण कोरियातील विद्यापीठांशी थेट संवाद साधण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. पीसीयू आणि दक्षिण कोरिया शैक्षणिक व सांस्कृतिक सहकार्यासाठी पूर्ण पाठिंबा देण्यात येईल, असे प्रतिपादन दक्षिण कोरियाचे वाणिज्य दूत यू डोंगवान यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि दक्षिण कोरियाच्या कोरियन एसएमई (कोस्मे) यांच्या मध्ये सोमवारी (२९ सप्टेंबर) पीसीयू साते मावळ येथे सामंजस्य करार करण्यात आला. या कार्यक्रमात कोरिया फॅसिलिटेशन सेंटरचे तसेच कोस्मे ट्रेनिंग प्रोग्रामचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कोस्मेचे चेअरमन जे क्युंग ली, पीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, माजी राज्यमंत्री व नुतन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजय (बाळा) भेगडे, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू अभ्यास मंडळ सदस्य सचिन इटकर, पीसीयूचे प्रभारी कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्र-उपकुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, पीसीयू उद्योग संस्था संवाद संचालक डॉ. प्रणव चारखा आदी उपस्थित होते.

जे क्युंग ली म्हणाले, या सहकार्यामुळे विद्यार्थी व तरुणांना कोरियन एसएमई सोबत प्रशिक्षण व रोजगार संधी उपलब्ध होतील. तसेच कोरियन एसएमईंना महाराष्ट्रात विस्तारासाठी मार्गदर्शन, कार्यालयीन सुविधा व कायदेशीर सहाय्य, भारत व कोरिया येथील स्टार्टअप्सना विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य मिळेल. सांस्कृतिक आदान प्रदानामुळे परस्पर समन्वय वाढेल आणि दीर्घकालीन भागीदारीस चालना मिळेल.

महाराष्ट्राला २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे सरकारचे ध्येय आहे. या करारामुळे तरुणांना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण, संशोधन आणि औद्योगिक संधी मिळणार असून हे ध्येय साध्य करण्यासाठी हा करार नक्कीच प्रेरक ठरेल. पीसीयू हे पश्चिम महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ असून कोस्मेसोबत ऐतिहासिक करार केला ही अभिमानास्पद बाब आहे. अशा आंतरराष्ट्रीय उपक्रमांमुळे पीसीयूच्या विद्यार्थ्यांना कोरियन कंपन्यांमध्ये संधी मिळतील आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले.

कोस्मेच्या जागतिक प्रशिक्षण व प्रमाणपत्र कार्यक्रमांचा लाभ पीसीयूच्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. कोरियन कंपन्यांमध्ये इंटर्नशिप, प्लेसमेंट व उच्च शिक्षणाच्या संधी, संयुक्त संशोधन उपक्रम, भविष्यकालीन क्षेत्रांमध्ये एआय, इव्ही, सेमीकंडक्टर व बायोटेक्नॉलॉजी अशा विविध क्षेत्रात संधी मिळणार आहेत, असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले.

यावेळी पीसीयू कोरिया फॅसिलिटेशन सेंटर मुख्य सल्लागार व सीईओ, स्टारजिनच्या युजिन हान यांचा विशेष गौरव करण्यात आला. त्यांनी दक्षिण कोरियाच्या नावीन्यपूर्ण उद्योग व्यवस्थेची ओळख करून देत या केंद्रामुळे भारतीय विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक वाहनं, सेमीकंडक्टर, आयटी व अत्याधुनिक उत्पादन क्षेत्रात संधी उपलब्ध होणार असल्याचे युजीन हान यांनी सांगितले.

खेड, तळेगाव, चाकण परिसरात अनेक कोरियन कंपनी आहेत. हा परिसर उद्योगांचा केंद्रबिंदू झाला आहे. कोरिया फॅसिलिटेशन सेंटरच्या स्थापनेमुळे भारत–कोरिया औद्योगिक सहकार्य अधिक बळकट होईल, असे सचिन इटकरे म्हणाले.

डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. सुदीप थेपडे यांनी मनोगत व्यक्त केले.

या केंद्रासाठी सल्लागार मंडळाची नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये - डॉ. दिनेश अमळणकर, अनिल कुमार सिन्हा, चिसुंग अन्ह, हायवॉन ली, हावॉन कु, जे जोंग ली, जे. एच. अन्ह, जोंग मान किम, नागेंद्र कौशिक, रमेश अय्यर, रौनाग पुंगालिया, सचिन सातपुते, संग जुन, सुंगवू बेंजामिन, सुन ह हा पार्क, तेसुंग किम, यंग क्यू ह्वांग, यंग पाक ली यांचा समावेश आहे.=

कार्यक्रमास एस बी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या डॉ. किर्ती धारवाडकर, पीसीसीओईआरचे डॉ. हरिश तिवारी, पुणे बिझनेस स्कूलचे डॉ. गणेश राव, एनएमव्हीपीएमचे डॉ. रामचंद्र जहागीरदार, एसबीपीएसच्या डॉ. बिंदू सैनी, विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




## मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये नवरात्रीचा नववा दिवस उत्साहात साजरा -

मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शाळेत नवरात्रोत्सवाचा नववा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. नवरात्रीचा नववा दिवस (महा नवमी) असून आजचा शुभरंग गुलाबी आहे, शिक्षकांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुलाबी रंगाचे कपडे परिधान केले होते. गुलाबी रंग प्रेम, करुणा, सौहार्द आणि आपुलकीचे प्रतीक मानला जातो. हा रंग मातेच्या स्नेहाचे आणि भक्तीभावाचे प्रतिनिधित्व करतो. आजच्या दिवशी माँ सिद्धिदात्री यांची पूजा केली जाते. त्या भक्तांना आठ सिद्धी प्रदान करतात. हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.



## डॉ.डी.वाय. पाटील विद्यापीठ सेंटर फॉर ऑनलाइन पुणे : नवरात्रीचा नववा दिवस उत्साहात साजरा -

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आजच्या गुलाबी रंगाच्या थीमनुसार डॉ.डी.वाय. पाटील विद्यापीठ सेंटर फॉर ऑनलाइन पुणे येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला .

# समाजोपयोगी उपक्रमातून टिळेकर यांचा वाढदिवस साजरा

## सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**। देहू । प्रतिनिधी : महाईन्यूज**

भारतीय जनता पार्टीच्या कामगार मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष संभाजी बाळासाहेब टिळेकर यांच्या वाढदिवसानिमित्त देहू गावात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून टिळेकर यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या निमित्ताने देहू गावात गरजू नागरिकांना आवश्यक वस्तूंचे वाटप, वृक्षारोपण, युवकांसाठी करिअर मार्गदर्शन शिबीर, तसेच विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम पार पडले.

या कार्यक्रमासाठी तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष राजाभाऊ जांभुळकर, माजी राज्यमंत्री आणि आमदार बाळाभाऊ भेगडे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका अश्विनीताई जाधव, देहू-देहूरोड मंडल अध्यक्ष रघुवीर शेलार, देहू-देहूरोड युवा मोर्चा अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे पाटील, सदन कमांड चेअरमन राजेश टिळेकर, नवलाख उंबरे गावचे उद्योजक प्रकाश पडवळ, हभप प्रभु महाराज माळी, देहू-देहूरोड मंडल प्रवक्ते गणेश खंडागळे, तुकोबा महाराजांचे 11वे वंशज हभप रायबा मोरे, क्रीडा आघाडी अध्यक्ष प्रवीण कांबळे, मंडल सचिव सचिन काळोखे, देहू शहराचे माजी अध्यक्ष मछिंद्र परंडवाल उपस्थित होते



कार्यक्रमात पारंपरिक कीर्तन, भजन, तसेच सांस्कृतिक सादरीकरण यामुळे धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. युवकांना उद्देशून प्रेरणादायी व्याख्याने आणि मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा उत्साह!

## आठव्या दिवशी मोरपंखी हिरव्या रंगात देवी महागौरीची आराधना




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा आठवा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परंपरेनुसार आजची माळ देवी महागौरी यांना अर्पण करण्यात आली. यानिमित्ताने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोरपंखी हिरव्या रंगाचे वस्त्र परिधान करून देवीची आराधना केली.**



### मोरपंखी रंगाचे प्रतिकात्मक महत्त्व

नवरात्रीच्या प्रत्येक दिवशी विशिष्ट रंगाचा वापर करण्याची परंपरा आहे. आठव्या दिवशीचा रंग मोरपंखी हिरवा हा नव्या जीवन, सौंदर्य, समृद्धी आणि उत्कर्ष यांचे प्रतीक मानला जातो. महागौरी देवीला हा रंग प्रिय असल्याने भक्तगण हा दिवस विशेष भक्तिभावाने साजरा करतात.

### भक्ती आणि शांतीचा संदेश

हा रंग भक्तीला सौम्यता व शांतीचा स्पर्श देतो तसेच आशा, नवनिर्माण आणि सकारात्मकतेची ऊर्जा निर्माण करतो. आठव्या दिवशी मोरपंखी हिरव्या रंगात देवी महागौरीची आराधना करण्यात येते. शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या दिवशी देवीची आराधना करून सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि आध्यात्मिक उर्जा अनुभवली.